कठीण काळात हार मानू नका, कारण सर्वात सुंदर गोष्टी संघर्षातूनच निर्माण होतात

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १५ एप्रिल २०२५ | अंक १२४● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु





# आज चैत्यभूमीवर पूर्वनियोजित भाषण होऊ शकलं नाही, एकनाथ शिंदे






## 'यापेक्षा दुसरं मोठं काय असू शकतं?'

आज दादर शिवाजी पार्क चैत्यभूमीवर सरकारच्यावतीने मुख्यमंत्री, दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्ताने अभिवादन केलं. यावेळी एकनाथ शिंदे यांचं पूर्वनियोजित भाषण झालं नाही. यावर पत्रकारांनी एकनाथ शिंदे यांना तुम्ही नाराज आहात का? म्हणून विचारलं. त्यावर ते म्हणाले की. "नाराजी कोणाची? बाबासाहेबांच्या चैत्यभूमीवर जाणं. बाबसाहेबांच दर्शन घेणं, त्यांना विनम्र अभिवादन करणं, यापेक्षा दुसरं मोठं काय असू शकतं?" "भाषणापेक्षा बाबासाहेबांच दर्शन मला मोठं होतं. मी सांगू तुम्हाला, प्रत्येकाने बाबासाहेबांचा एकतरी गुण घेतला पाहिजे. बाबासाहेब तुमच्यातला एक अंश जरी मिळाला, तरी मनुष्यजीवन सार्थक होईल. यापेक्षा दुसरं काय महत्त्वाच" असं एकनाथ शिंदे म्हणाले.

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकराचं स्मारक उभं राहतय. जगाला हेवा वाटाव असं स्मारक उभ राहतय. तमाम देशवासियांसाठी ही अभिमानाची बाब आहे. आज बाबासाहेबांचा जयंती उत्सव आहे. बाबासाहेब खरं म्हणजे संविधानाचे शिल्पकार आहेतच, पण माणुसकीचे सुद्धा शिल्पकार आहेत. माणसाने कसं जगावं, शिका, संघटित व्हाव, संघर्ष करा, न्याय मिळवा हे बाबसाहेबांच बीद्र वाक्य होतं. म्हणून मी बाबासाहेबांना वित्रम अभिवादन करतो" असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. "आमच सरकार देखील बाबासाहेबांच्या विचारांवर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाने चालणारं आहे. बाबासाहेबांनी लिहिलेली घटना सर्वसामान्यांना न्याय देणारी घटना आहे. म्हणून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती या देशाचे पंतप्रधान झाले. शेतकऱ्याचा मुलगा या राज्याचा मुख्यमंत्री झाला. एक आदिवसी भगिनी या देशाची राष्ट्रपती झाली" या शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केला. "ही जादू, किमया बाबासाहेबांच्या घटनेची आहे. म्हणून मी पुन्हा एकदा महाराष्ट्रातल्या तमाम जनतेला बाबासाहेबांच्या जयंतीच्या शुभेच्छा देतो" असं एकनाथ शिंदे म्हणाले.





# बीडमध्ये भीमसागर उसळला!




बीडः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने खिचडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता नागरिकांतून प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यावेळी वंचित बहुजन आघाडीची पूर्ण टीम कार्यरत होती.

## सलमानला बॉम्बने उडवून देण्याची धमकी; करुणा शर्मांना वेगळाच संशय, केलं मोठं वक्तव्य

अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, सलमानची गाडी बॉम्बने उडवून देऊ, सलमानच्या घरात घुसून त्यालाही बॉम्बने उडवू, असं धमकीमध्ये म्हटलं आहे. मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाच्या व्हॉट्स अॅप क्रमांकावर ही धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या तक्रारीनुसार अज्ञात व्यक्तीविरोधात वरळी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. आता या प्रकरणात करुणा शर्मा यांनी प्रतिक्रिया देताना मोठं वक्तव्य केलं आहे. नेमकं काय म्हणाल्या करुणा शर्मा? सलमान खान धमकी प्रकरणावर प्रतिक्रिया देताना करुणा शर्मा यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. फक्त सलमान खानलाच का धमक्या मिळत आहेत, अमिताभ बच्चन आणि अक्षय कुमारला धमक्या का येत नाहीत? मला वाटतं येणाऱ्या निवडणुकीत फक्त हिंदू, मुस्लिम आणि ओबीसींशिवाय दुसरा कोणताही मुद्दा त्यांच्याकडे नाही, पण आमचे देवेंद्र फडणवीस साहेब सुरक्षा देण्यास सक्षम आहेत, असं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. दरम्यान संतोष देशमुख हत्याकांडातील मास्टरमाईंड असलेल्या वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर आपल्याला देण्यात आली होती, असा खळबळजनक दावा निलंबित पोलीस अधिकारी रंजित कासले यांनी केला आहे. रंजित कासले यांच्या या दाव्यावर देखील करुणा शर्मा यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

## दिंडी मार्गाला माजलगाव ते तेलगाव दरम्यान पुन्हा भेगा

माजलगाव / प्रतिनिधी पालखी महामार्ग असलेल्या माजलगाव - तेलगाव रस्त्यावर पुन्हा भेगांचे प्रमाण वाढले असुन ऐन उन्हाळ्यांमध्ये दुचाकींसह इतर वाहनांच्या आपघातात वाढ झाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या रस्ता दुरूस्तीचे काय झाले असा सवाल उपस्थित केला जात आहे. खामगाव - पंढरपुर हा दिंडी महामार्ग शहरातुन गेलेला आहे. त्यामुळे शहराच्या वैभवात भर पडली असुन दळणवळण देखील सोपे झाले आहे. त्याचबरोबर माजलगाव शहर देशाच्या नकाशावर या रस्त्यामुळे आले आहे. परंतु माजलगाव - तेलगाव या विस ते बावीस किलोमिटर अंतराचे झालेले निकृष्ट काम यामुळे या रस्त्यावर रस्ता कमी आणि भेगाच अधिक अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे हा माजलगाव- तेलगाव रस्ता खोदुन नव्याने करू असे आश्वासन विधानसभा निवडणुकीत राजकीय मंडळींनी दिले होते. परंतु निवडणुक संपताच नेते मंडळींना आश्वासनाची मात्र आठवण राहत नाही अशीच काहीशी परिस्थिती या रस्ता कामात देखील झाली आहे. सध्या सुर्य आग ओकत असुन या रस्त्यावरून ये - जा करतांना मोठी कसरत करावी लागत असल्याची ओरड दुचाकी व रिक्षाचालकांतुन होत आहे कारण या रस्त्यावर दुचाकी व रिक्षाचे टायर



अडकण्यासारख्या मोठ - मोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या भेगा बुजविण्यापेक्षा या रस्त्याचे काम दर्जेदार व उत्कृष्ट नव्याने करावे अशी मागणी जोर धरत आहे. महामार्ग विभाग व बांधविभागाने तातडीने सदरील रस्त्याची दुरुस्ती न केल्या नागरीकांमधून तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. काम मंजुरीचा राजकीय नेत्यांचा कांगोवा माजलगाव- तेलगाव या रस्त्याचे काम नव्याने करण्यासाठी रस्ते मंत्र्यांना निवेदन देत रस्ता काम मंजुर केल्याचा कांगोवा राजकीय मंडळींनी केला. प्रत्यक्षात मात्र या रस्ता कामाकडे लोकप्रतिनिधींसह सर्वांचेच दुर्लक्ष आजघडीला दिसुन येत आहे. अवजड वाहतुकींसह प्रवासी वाहतुक या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात असल्याने या रस्त्याचे काम करावे अशी मागणी जोर धरत आहे. दुरुस्ती करण्यात येईल यापुर्वी या रस्त्यावरील भेगा बुजविण्यात आल्या होत्या.

# गडचिरोलीमधील नक्षलवाद संपवण्यासाठी नितीन गडकरींनी सांगितला मेगा प्लॅन

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गडचिरोलीमधील नक्षलवाद संपवण्यासाठी मेगा प्लॅन सांगितला. मुंबईत आयोजित कार्यक्रमात गडचिरोलीसाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाचे सुरु असलेले उपक्रम गडकरी यांनी सांगितले. गडकरी म्हणाले, गडचिरोली येथून एक रस्ता काढायचे आहे. जो थेट विशाखापट्टणम पोर्टला जोडला जाईल. रायपूर ते विशाखापट्टणम एक एक्सप्रेस बांधत आहोत. रस्ते झाले की त्या भागाचा विकास होतो. चित्र बदलते. दावोस येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीसाठी गुंतवणूक आणली आहे. साडेसहा लाख कोटी रुपयाची गुंतवणूक या भागांत येत आहे. यामुळे जगातील सगळ्यात चांगले लोखंड या ठिकाणी तयार होईल. या प्रकल्पात 80 टक्के स्थानिक मुलांना काम मिळावे, असे सांगितले असल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.गडचिरोलीमध्ये होत असलेल्या बदलाबाबत नितीन गडकरी म्हणाले, या भागात असलेल्या नक्षलवाद्यांना मी देखील भेटलो होतो. त्यांची समजावले होते. त्यांना काम दिले. काम मिळाल्याने तीन हजार नक्षलवादी कामाला लागले. त्यांनी नक्षल अॅक्टिव्हिटी त्यांनी सोडल्या. जल, जंगल यातून कसा विकास होईल यासाठी प्रयत्न करत आहोत. मी राजकारण करतच नाही. 90 टक्के हेच समाजकारण करतो. गडचिरोलीला 500 विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल बांधणार आहे.29 वर्षांपूर्वी गडचिरोलीत असलेल्या नक्षलवादाची आठवण गडकरी यांनी सांगितले. गडचिरोली हे नक्षलवादी गाव म्हणून ओळखले जात होते. परिस्थिती अत्यंत बिकट होती. मी निवडणुकीसाठी तेथील एका भागात प्रचारासाठी गेली होतो. त्यावेळी पोलिसांनी मला घेरले. चहा पिण्यासाठी पण पोलिसांनी तंबू दिला नाही. परंतु आज परिस्थिती पूर्ण बदलली आहे. आज या ठिकाणी 1200 शिक्षक आहेत. 30 हजार विद्यार्थी शिकत आहेत. आता 30 हजार विद्यार्थी संख्या 1 लाख करायची आहे, असा संकल्प गडकरी यांनी जाहीर केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १५ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com




## संपादकीय

## स्त्रियांचे खरेखुरे आराध्यदैवत: भारतरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर

बाबासाहेबांनी शुद्रांसाठी केलेले कार्य सर्वश्रुत आहे . परंतु महिलांसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा हा संक्षिप्त आढावा . एका स्त्रीचे दुःख स्त्रीच समजू शकते या वाक्याला अक्षरशः खोटे ठरवत महाराष्ट्र तील स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज , स्त्री शिक्षणाचे उद्धारकर्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न , परमपूज्य , संविधानलेखक , अर्थशास्त्रज्ञ ,जगात नावलौकिक असलेले डॉ बाबासाहेब आंबेडकर या गुरु शिष्य त्रिकुटाने स्त्रियांच्या रक्षणाकरिता आणि उद्धाराकरिता आपले जीवन अर्पिले . ज्या महामानवाने पुस्तकांसाठी बंगला बांधला , त्यात २२ हजारांपेक्षा ही जास्त पुस्तकांचा संग्रह होता , अन्न , वस्त्र , निवारा याप्रमाणेच पुस्तके ही देखील मानवाची मूलभूत गरज आहे असे मानणारे , त्यांनी जवळपास पूर्ण झालेले एकूण २२ ग्र ंथ , अपूर्ण असलेले दहा ग्र ंथ , १० शोधनिबंध असे भरपूर पुस्तके लिहिली . पुस्तके खरेदी करण्यासाठी पैसे नसल्याने ग्र ंथालयांमध्ये दिवस रात्र बसणारे , उच्च कोटीचे पुस्तक प्रेमी भारतरत्न परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एका पुस्तकाचे सार्वजनिक दहन करावे ? का ? काय असेल त्या पुस्तकात की त्यांनी एवढे टोकाचे पाऊल उचलले. डॉ बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले ; जे केवळ पुस्तक जाळणे नव्हते तर त्यातील दडपशाही विचारसरणीला विरोध दर्शविण्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी एक पाऊल होते . मनुस्मृति या पुस्तकामध्ये स्त्रियांविषयी अतिशय जाचक प्रथा नमूद केल्या होत्या की महिलांना कोणताही धार्मिक विधी करण्याचा , नवस करण्याचा किंवा उपवास करण्याचा कोणताही दैवी अधिकार नाही . तिचे एकमेव कर्तव्य म्हणजे तिच्या पतीची आज्ञा पाळणे आणि त्याला संतुष्ट करणे तरच तिला स्वर्गात उच्च स्थान मिळेल . पतीच्या कर्तव्याचे आणि आचारसंहितेचे उल्लंघन करणारी कोणतीही महिला अपमानित होते आणि तिला कुष्ठरोग होतो . मृत्यूनंतर ती कोल्हाळाच्या गर्भाशयात प्रवेश करते . धार्मिक विधी करण्यात काही अडचण असल्यास २४ ते ३० वयोगटातील पुरुषांनी ८ ते १२ वयोगटातील मुलीशी लग्न करावे . एक स्त्री कधीही स्वतंत्र असू शकत नाही , विधवा स्त्रीला जगण्याचा अधिकार नाही आणि जगलीच तर तिने कुरूप दिसावे तिला नटण्याचा , सुंदर दिसण्याचा अधिकार नाही . पुनर्विवाह तर खूप दूरची गोष्ट . एका विधवा स्त्रीला कोणत्याही धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमात जायची परवानगी नसे .असे एक न अनेक अत्याचार स्त्रियांना सोसावे लागत असत . शूद्रांची अवस्था तर त्या पेक्षा ही कठीण . डॉ.बाबासाहेबांनी मनुस्मृति फक्त जाळलीच नाही तर स्त्रियांना समान वागणूक मिळावी यासाठी ४ वर्षे १ महिना आणि २६ दिवस काम करून हिंदू कोड बिल तयार केले . डॉ बाबासाहेब एक प्रख्यात वकील होते. त्यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल अशी अपेक्षा नव्हती . त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते . स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ बाबासाहेबांनी १९४८ मध्ये संविधान सभेत हिंदू कोड बिलचा मसुदा प्रस्तुत केला . परंतु प्रतिगामी विचारांच्या काही सभासदांनी त्याला विरोध केल्यामुळे ते समंत होऊ शकले नाही . त्यामुळे त्यांनी २५ सप्टेंबर १९५१ ला पंतप्रधान पंडित नेहरू यांच्याकडे राजीनामा पाठविला . त्यात त्यांनी लिहिले ,फ हिंदू कोड बिलाचा खून झाल्यामुळे मी राजीनामा देत आहे म . सत्तेपेक्षा महिलांना हक्क मिळणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते . त्यांनी सत्तेसाठी तत्व सोडले नाहीत , तर तत्त्वासाठी सत्तेचा त्याग केला . तरीही आज लोक त्यांना जातीच्या तराजूमध्ये तोलतात . विशिष्ट जातीच्या लोकांकडूनच त्यांचा आदर व्हावा , असे तर नव्हते आपले बाबासाहेब . त्यांनी सर्वांसाठी जिथे जिथे अन्याय होतोय तिथे तिथे न्याय केला आणि मरेपर्यंत समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला प्रत्येक स्त्रीला हिंदू कोड बिल काय आहे हे जाणून घेणे अत्यावश्यक आहे. त्यांनी स्त्रीला घटस्फोट देण्याचे अधिकार दिले . त्याच बरोबर विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार दिला . स्त्रिया बाळ दत्तक घेऊ शकतात , त्या पुनर्विवाह करू शकतात , पुरुषांना बहुपत्नीत्वापासून रोखले गेले . तसेच बाबासाहेबांनी मजुरांसाठी खूप मोठे कार्य केले . त्यांनी पाहिले कि महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खाण काम करू लागल्या आहेत . मजूर मंत्री म्हणून खाण महिला आणि कामगारांसाठी तरतुदी केल्या . ज्याप्रमाणे पुरुष खाणकामगाराबद्दल डॉ. आंबेडकरांनी विचार व्यक्त केले , त्याचप्रमाणे स्त्रियां बाबतीतही २९ मार्च १९४५ ला विधेयक आणून चर्चा केली . प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतूद , रोख मदत , किमान चार आठवडे प्रसूती भत्ता मिळावा तसेच कामगार गैरहजर असताना पगारी सूट्टी , स्त्री व पुरुषांना समान वेळेसाठी समान वेतन मिळावे यासाठी त्यांनी कायदे बनविले . आज आपल्याला या गोष्टी साधारण वाटतात पण त्या काळच्या स्त्रियांनी या जाचक प्रथांमुळे जो अन्याय सहन केला आहे , त्यांची वेदना डॉ बाबासाहेबांनी समजून घेतली . आज कोणत्याही देवाने किंवा कोणत्याही धर्माने नव्हे तर बाबासाहेबांनी आपल्याला हक्क दिले आणि त्यामुळे स्त्री आता एका मंदिराची पुजारी आहे , ती अंतराळात जाऊन येण्याची धमक ठेवते , ती एक अर्थशास्त्रज्ञ आहे , ती एक राष्ट्रपती होऊन देश चालवू शकते , ती एक पायलट आहे . जी पुरुषांप्रमाणेच आकाशात उंच भरारी होऊ शकते , संसदेमध्ये निर्भीडपणे बोलू शकते. बाबासाहेबांची दूरदृष्टी आणि स्त्रियांबद्दलची आस्था त्यांच्या प्रत्येक भाषणातून दिसून यायची.

# राणा भारताच्या ताब्यात



मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला भारतात आणण्यात यश आले आहे. अमेरिकेकडून त्याच्या प्रत्यार्पणाला हिरवा कंदिल मिळाल्यानंतर भारतीय पथकाने त्याला अमेरिकन ङ्गगल्फस्ट्रीम जी-५५०फ या विमानाने दिल्लीच्या पालम विमानतळावर आणले. त्यानंतर मूळचा पाकिस्तानी आणि नंतर कॅनडाचा नागरिक असलेल्या तहव्वूर राणा याला थेट राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मुख्यालयात नेण्यात आले. यावेळी मुख्यालयाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. २६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाचे भारताकडे प्रत्यार्पण केल्यानंतर पाकिस्तानने आपले हात झटकले आहेत. राणाने गत दोन दशकांत त्याच्या पाकिस्तानी कागदपत्रांचे नूतनीकरण केलेले नाही. त्यामुळे तो कॅनेडियन नागरिक असल्याचे अगदी स्पष्ट आहे, असे पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने म्हटले आहे. आता पाकिस्तानने हात झटकले असले तरी ङ्गसुंभ जळाला तरी पीळ कायम असतोफ हे त्यांच्या लक्षात यायला हवे. लक्षात आले असले तरी कांगावा करण्याचे प्रयत्न होतच असतात! दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी तहव्वूर राणा याचे अमेरिकेहून भारतात पदार्पण होणे हे भारतासाठी मोठे यश आहे, अशी प्रतिक्रिया दहशतवादी हल्ल्यातून बचावलेल्या साक्षीदार देविका रोटावन यांनी दिली आहे. पाकिस्तानात लपून बसलेल्या इतर कटकारस्थान्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली. २६/११ प्रकरणातील महत्त्वाच्या साक्षीदार असलेल्या रोटावन यांनी न्यायालयात दहशतवादी कसाबची ओळख पटवून दिली होती. राणा याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. अवघ्या ९ वर्षांच्या असताना देविका रोटावन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे झालेल्या गोळीबारात जखमी झाल्या होत्या. त्यांच्या पायाला गोळी लागली होती. वडील आणि भावासोबत पुण्याला जाण्यासाठी रोटावन प्लॅटफॉर्मवर रेल्वेची वाट पाहत असताना स्टेशनवर दहशतवादी हल्ला झाला होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी १० शस्त्रसज्ज पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबईवर भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यात ३४ परदेशी नागरिकांसह किमान १९७ निष्पाप लोकांचे बळी गेले होते तर ८०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते. मुंबई पोलिस व भारतीय सुरक्षा दलांनी ९ दहशतवाद्यांना ठार केले होते तर अजमल कसाब या एकमेव दहशतवाद्याला जिवंत पकडले होते. राणाचे प्रत्यार्पण हे हल्ल्यातील पीडित कुटुंबे आणि मुंबईसाठी न्याय व समाधान मिळवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. १६ वर्षांच्या लढ्यानंतर राणाचे प्रत्यार्पण झाले आहे. आता डेव्हिड हेडली आणि हाफीज सईद यांनाही भारतात आणून त्यांना शिक्षा दिली पाहिजे. २००८ च्या मुंबई हल्ल्यातील सहभाग प्रकरणी राणा अमेरिकेत शिक्षा भोगत होता. मे २०२३ मध्ये राणाच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेतील कोर्टाने मंजुरी दिली होती. त्या निर्णयाला राणाने अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टात याचिकेद्वारे आव्हान दिले होते. ही याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली होती. राणा हा त्याचा मित्र डेव्हिड हेडली याच्यासह डेन्मार्कमध्ये मुंबईवर हल्ला घडवून आणण्याच्या योजना आखल्याच्या आरोपाखाली २०१३ मध्ये दोषी आढळला होता. अमेरिकन कोर्टाने त्याला १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. गत ४० वर्षांत भारतात अनेक दहशतवादी हल्ले झाले आणि त्या सर्वांचे कोणी ना कोणी मास्टरमाईंड असल्याचे सुरक्षा यंत्रणांच्या लक्षात आले. हे मास्टरमाईंड त्याच्या मास्टर प्लॅनप्रमाणे हल्ले घडवत आले परंतु त्यातल्या फारच थोड्यांना शिक्षा होऊ शकली. कारण या दहशतवादी मास्टरमाईंडना पकडण्याकरिता आवश्यक ते उपाय करता आले नाहीत. आता देखील राणाला भारतात आणल्याचा गाजावाजा होतो आहे. परंतु त्याला पकडण्याकरिता १५ वर्षांचा कालावधी लागला. भारतात हल्ले घडवायचे आणि परदेशात पळून जायचे हे प्रकार पूर्वीपासून होत आले आहेत. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यांचा इतिहास पाहता सर्वप्रथम नाव येते ते दाऊद इब्राहिमचे. त्याने १२ मार्च १९९२ ला मुंबईत १२ बॉम्बस्फोट घडवले. हा भारतातला सर्वांत मोठा दहशतवादी कट होता. राणाविरुद्धचा खटला जलदगती कोर्टामध्ये चालवून त्याला लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे. नसता त्याला सांभाळण्यात विनाकारण मोठा खर्च करावा लागेल. हत्ती पोसण्यासारखा हा प्रकार होईल. दहशतवादाच्या आगीत भारत हा सर्वाधिक पोळलेला देश आहे. स्थानिक पातळीवर भारताने हा दहशतवाद संपुष्टात आणण्याच्या दिशेने कठोर पावले उचलली नाहीत म्हणूनच इतक्या मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. खरे तर संपूर्ण जगाने दहशतवादाविरुद्ध एकत्र यावे असे आवाहन भारताने वारंवार केले होते. पण अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाच जगाला दहशतवादी हल्ल्यातील दाहकता लक्षात आली. तरीसुद्धा दहशतवादाचा झटका बसलेल्या अमेरिकेने राणासारख्या दहशतवाद्याचे प्रत्यार्पण करण्यासाठी विलंब लावला. कदाचित अमेरिकेला भारतातला दहशतवादी हल्ला फारसा महत्त्वाचा वाटला नसावा. भारताने यापासून योग्य धडा घेतला पाहिजे. २६/११च्या हल्ल्यामागे दाऊदचा अदृश्य हात होता. म्हणून त्यालाही भारतात आणून शिक्षा केली पाहिजे. ते शक्य होत नसेल तर अमेरिकेने जसे लादेनला संपवले तसे दाऊदलाही संपवले पाहिजे. गत काही वर्षांत भारतातले हल्ले थांबलेले दिसत असले तरी अशा हल्ल्यांना सहानुभूती असणारी मानसिकता अजूनही कार्यरत आहे. छोटे-मोठे दंगे घडवण्यामागे तीच मानसिकता आहे. राणासारखा मास्टरमाईंड जरी हाताशी लागला तरी स्थानिक पातळीवर मदतीचा हात देणारे छुपे माईंड भरपूर आहेत. त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. काश्मीरमध्ये पोसला गेलेला दहशतवाद राजकारण्यांच्या छत्रछायेखाली पोसला गेलेला दहशतवाद होता. राणासारखा दहशतवादी पकडला जाऊ शकत असेल तर पाकिस्तानात बसून भारतातल्या घडामोडींचे सूत्रसंचालन करणा-या आणि अनेक वर्षे भारताला चकवा देणा-या मास्टरमाईंड दाऊद इब्राहिमचा हिशेब करण्याची वेळ आली आहे. समन्वय, सातत्याने प्रयत्न आणि सकारात्मक पाठपुरावा केला तर असाध्य ते साध्य होऊ शकते.

# उमरेकरांची मरणोत्तरही होत आहे हेळसांडसरणही थकले

## मरण पाहुणी, मरणानंतरही भोगाव्या लागतात नरक यातना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील अनेक वाडी-तांड्यात विकास पोहोचला. पण तालुक्यातील एकमेव असं गाव आहे.येथे स्वातंत्र्याच्या ७६ वर्षानंतरही यागावात आजही स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात मृतदेहावर अंत्यसंस्कार करायचे कुठे ? असा प्रश्न गावकऱ्यावर पडतो लोहा तालुक्यातील उमरा हे शेवटच्या टोकावरचे गाव राजकारणात आणि समाजकारणात जिल्ह्यात आणि तालुक्यात नावाजलेलं गाव म्हणून उमऱ्याची ख्याती पण आजही अंत्यविधी करण्यासाठी गावात स्मशानभूमीची कुठलीच सुविधा नाही.पावसाळ्यात तर अडचणींचा डोंगरच असतो.

सरणही थकले मरण पाहुणी, मरणानंतरही भोगाव्या लागतात नरक यातना.या ओळी जणू स्मशानभूमीत असलेल्या अडचणीचा पाढाच वाचत आहेत.तालुक्यातील अनेक गावात स्मशानभूमी झाल्या. विकासकामेही झाली.देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली पण उमरा गावामध्ये आजही स्मशानभूमीच नसल्याने ग्रामस्थांना मरणानंतरही भोगाव्या लागतात नरक यातना. पावसा-पाण्याच्या दिवसात अचानक कुणी दगावल्यास अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमी नसल्याने अंत्यविधी करण्यासाठी ग्रामस्थांना सरण रचतांना चितेवर चक्क ताडपत्रीचा आधार घ्यावा लागतो.कसेबसे सरण रचल्यानंतर संततधार पावसामुळे चितेला अग्नी कसा द्यावा, असा प्रश्न नागरिकांना पडतो. मृत पावलेल्या व्यक्तींचे अंत्यसंस्कार हे गावाबाहेरील नदीकाठीच होत असल्याने नदीला पूर येण्याची ही भीती उद्धवते.पावसा पाण्याच्या दिवसात तर मृतदेह अर्धेच जळतात, पुन्हा पाऊस उघडल्यावर लाकडे टाकावी लागतात. काही वर्षांपूर्वी तर गावातीलच वयोवृद्ध महिलेचे अंत्यसंस्कार चालू असतानाच नदीला पूर येऊन मृतदेह अर्धवट जळालेल्या स्थितीत नदीत वाहून गेल्याची ही घटना घडली आहे. ग्रामपंचायतची उदासीनताच गावकऱ्यांच्या मुळावर :- अनेक वेळा समशानभूमीच्या संदर्भात गावकऱ्यांच्या समवेत कागदोपत्री संभाजी ब्रिगेडच्या वतीने ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजून सुद्धा स्मशानभूमीसाठी कुठलेही ठोस पाऊल उचलताना दिसत नाही.म्हणूनच काय ग्रामपंचायतीची उदासीनता गावकऱ्यांच्या मुळावर येऊन ठेपली आहे.

ग्रामस्थ : बालाजी सिरसाट

# उमरा येथील शेतकऱ्यांनी केली महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी

## सतत शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या कृषी मंत्र्यांचाही केला निषेध

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शेतकऱ्यांना कर्जमाफी, मोफत वीज, बोनस अशा अनेक आश्वासनांची पूर्तता न केल्याने महायुती सरकारविरोधात तीव्र संताप उसळला आहे.लोहा तालुक्यातील उमरा येथील शेतकऱ्यांनी महायुतीच्या सरकारने शेतकरी कर्जमाफीचा शब्द न पाळल्याने त्या निषेधार्थ १४ एप्रिल रोजी उमरा येथे ग्रामपंचायत समोर गावातील शेतकऱ्यांनी महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी करत निषेध व्यक्त केला तसेच सतत शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या कृषी मंत्र्यांचाही यावेळी जाहीर निषेध करण्यात आला. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.असे असताना युती सरकारचे अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जबाकी भरण्याचे आदेश दिले आहेत. या बरोबर जाहीरनाम्यातील इतर आश्वासनांच्या पूर्ततेबाबत अशीच अवस्था आहे. महायुती सरकारने जनतेच्या केलेल्या फसवणुकीचा निषेध करण्यासाठी





१४ एप्रिल रोजी उमरा येथे महायुती सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करण्यात आली व निषेध व्यक्त करण्यात आला. वरीलपैकी कोणतेही आश्वासन पूर्ण केलेले नाही.उलट शेतकऱ्यांना ३१ मार्च अखेर पीक कर्जफेड न केल्यास वसुलीच्या नोटिसा पाठवण्याचा इशारा दिला आहे. निवडणुकीत केवळ मते मिळविण्यासाठी शेतकऱ्यांची घोर फसवणूक केली आहे. लाडकी बहीण योजनेत महिलांना २१०० रुपये प्रति महिना देण्याचे आश्वासन दिले. आता मात्र अनेक महिलांना २१०० रुपये तर नाहीच, उलट १५०० रुपये सुद्धा मिळत नाहीत. बेरोजगारांना १० हजार रुपये प्रतिमहिना भत्ता, ज्येष्ठ नागरिकांना दरमहा २१०० रुपये अनुदान देणार, कृषी निविष्ठांवर आकारला जाणारा राज्याचा जीएसटी माफ करणार, वन्य प्राण्यांचा त्रास व त्यापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करणार अशी अनेक आश्वासने फोल ठरत आहेत. शेतकऱ्यांबरोबर फसवणूक झालेल्या लाडक्या बहिणी, बेरोजगार तरुण, ज्येष्ठ नागरिक व इतर घटकांनी युती शासनाचा निषेध व्यक्त केला. यावेळी शेतकरी संघटनेचे मोहनराव सिरसाट शेतकरी संभाजीराव सिरसाट, संभाजी पांचाळ ,दादाराव कदम, माधव गंगातीरे ,विनायक सिरसाट, गोविंद सिरसाट ,पांडुरंग बोडके, किशन सिरसाट ,दाजीराव सिरसाट ,बालाजी शिंदे ,बालाजी सिरसाट, गणेश कदम ,देविदास सिरसाट,पद्माकर सिरसाट साहेबराव वाघमारे,श्रीहरी सिरसाट,पंडित सिरसाट,माधव पतलाये यांच्यासह शेतकरी शेतमजूर बेरोजगार तरुण ज्येष्ठ नागरिक आदी उपस्थित होते.

# लघुपट शिक्षा

एक गाव असतं जरासं सुधारलेलं, सुसज्ज माणसानी भरलेलं. त्यादिवशी मोठया आलिशान घरात लाकडं तोडण्यासाठी एक गडी माणूस आणला होता तो घराच्या मागच्या बाजूला लाकडं तोडत होता, भर दुपार होती त्यामुळे आजूबाजूच्या घरातील माणसं झोपली होती पण तो मात्र अजिबात कामचुकारपणा नकरता लाकडं तोडत एवढ्यात पलीकडे असलेल्या घरातून एक वीस बावीस वर्ष्याचा मुलगा बाहेर आला पडवीत वाळत घातलेले कपडे त्याने काढले आणि बाकावर ठेवले आणि तो ती दोरी सोडवून घेऊन आत गेला खरंतर हे चित्र बघताना तो गडी जरा विचारात पडला, नेमकी त्यांनी ती दोरी का सोडली, भर दुपारी वाळत घातलेले कपडे का काढले? घरात कुणी आहे का याच्या की एकटाच आहे... की आणखी काहीतरी याच्या मनात चाललंय या प्रश्नांची उत्तरे त्याला शोधण्याची तेवढीशी गरज वाटली नाही म्हणून आलेले प्रश्न तसेच परतवून लावले आणि तो आपले काम करत राहिला..... पाचच्या सुमारास त्या घरात एक चाळीशीची बाई गेली तिच्या खाकेला पर्स होती हातात पिशवी होती, तीने दरवाजा ढकलला आणि ती खडकन मोठ्याने ओरडत सोनू म्हणत उभ्याने कोसळली. अक्खा गाव जमा झाला तिच्या मुलाने स्वतःला पंख्याला टांगल होतं आणि तो गडी मात्र डोक्यावर हात मारत तिथेच बसला आणि स्वतःला कोसू लागला आणि म्हणाला माझ्यातली माणुसकी अशी कशी संपली, का नाही कोणाला संगितलं त्याने दोरी सोडवून नेल्याचं....... आणि अजूनही पश्चतापच्या आगीत होरपोळतोय... खरंच माणुसकी संपली आहे का?

बबिता गावस
गोवा

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १५ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com





लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव कारखाना कार्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, कर्मचारी संघटना उपाध्यक्ष दत्ता सोळंके, अशोक पाटील,दासराव मोरे,अजय लगड, राहुल सावंत, अशोक तिडके, उल्हास मुजमुले, अर्जुन गालफाडे आदी

# श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी
## संगीत विभाग व महिला शिक्षिकांच्या भिम गीताने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

माजलगाव- भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी संगीत विभाग व श्रीमती स्मिता पांडे, श्रीमती जया नागरगोजे, श्रीमती प्रज्ञा देशपांडे, श्रीमती स्वप्ना देशपांडे यांनी भीम



गीते , बहारदार भीम गीत सादर केले. यासाठी संगीत साथ कुणाल कुलकर्णी, प्रथमेश खुर्पे, श्रीमती अपर्णा मुळे यांची लाभली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप यांनी सांगितले की, भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले, आभार व सुत्रसंचलन श्रीमती पल्लवी कानडे यांनी केले, कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला. यानंतर शहरातील भीमनगर भागातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, स्थानिक संस्था सभासद प्रेमकिशोर मानधने, जगदीश सारवरे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच इयत्ता दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी ; सार्वजनिक उत्सव समिती अध्यक्षपदी शंकर निमर्ळ तर उपाध्यक्षपदी अमोल निमर्ळ यांची निवड

लिंबागणेश:- ( दि.१४) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.१४ एप्रिल सोमवार रोजी राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष शंकर निर्मळ यांनी केले.आभारप्रदर्शन उपाध्यक्ष अमोल निर्मळ यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य,समता, बंधुता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन देशातील उपेक्षित समुहातील बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठवण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे प्रतिपादन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष



रविंद्र निर्मळ यांनी केले. प्रा. लेनाजी गायकवाड यांनी आदर्श डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात यावी हे कविता सादर केली.यावेळी राजाभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ ,बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात,रमेश गायकवाड, सुरेश निर्मळ,अँड.गणेश वाणी, रामदास मुळे,दादा गायकवाड, संतोष भोसले आदी सहभागी होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असुन अध्यक्षपदी शंकर ऊर्फ रिंकु निर्मळ यांची तर उपाध्यक्षपदी अमोल निर्मळ यांची निवड करण्यात आली.सचिवपदी स्वप्निल वक्ते,कोषाध्यक्ष पदी स्वप्निल निर्मळ, सभासद म्हणून सुमेध निर्मळ, स्वप्निल निर्मळ,सौरभ निर्मळ, प्रकाश निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड यांची आरूण निर्मळ,जितु निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ,पोपट निर्मळ बन्सी निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी निवडी करण्यात आल्या. समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी भिमजयंती साजरी करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## आदर्श प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ ,बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



बीड प्रतिनिधी :- आदर्श प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती डोके मॅडम होत्या . कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प हार अर्पण करण्यात आला . कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक ,प्राध्यापक, शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची ओळख आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

# ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत आज माजलगावात बैठक

माजलगाव दि.१४( प्रतिनिधी) श्री क्षेत्र चाकरवाडी चे ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज दिनांक १५ एप्रिल रोजी माजलगावात माऊली भक्तांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीस भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु श्री ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडी क्षेत्र रोपे महोत्सवी वर्षानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह कथा शिव महापुराण कथा आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते परम पुज्य पं प्रदीपजी मिश्रा यांचे शिवमहापुराण कथा श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे आयोजित करण्यात आले आहे




त्यानिमित्ताने माजलगाव येथे श्री ह भ प महादेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होणार असून ही बैठक आज दिनांक १५एप्रिल रोजी डॉक्टर भारतराव वाघमोडे यांच्या माऊली नेत्रालय येथे दुपारी एक वाजता होणार आहे तरी सर्व माऊली भक्तांनी उपस्थित रहावे असे आव्हान असे आव्हान माजलगाव येथील माऊली भक्त यांनी केले असून यावेळी अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा श्री प्रदीप जी मिश्रा यांच्या मुखातून कथेचे आयोजन करण्यात आले आहे याची रूपरेषा ठरविण्यासाठी ही बैठक आयोजित केली असून जास्तीत जास्त माऊली भक्तांनी उपस्थित राहावे या बैठकीत नियोजना व व्यवस्थेचे रोपरेषा ठरणारा असून जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्ताने उपस्थित राहावे कारण जवळपास लाखो जनसमुदाय जमणार असून याचे नियोजन करण्यासाठी श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे तरी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहावे असे आवाहन माऊली भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.



माजलगाव : ( ) राज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ माजलगाव येथे विश्वरत्न बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली असता अभिवादन करतांना अंकुश मेंडके श्रीराम धूपे कैलास पाटोळे नामदेव पोहेकर लक्ष्मण रांजवण मदन पांढरे शब्बीर पठाण अतिक पठाण यांच्यासह सोमनाथ जावळे अविनाश पवार स्वप्निल टाकणखार रामेश्वर मेंडके जैनुद्दीन शेख करीम शेख दामोदर वाघमारे ज्ञानोबा आळशे आदी मान्यवर उपस्थित होते



नांदेड : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले.यावेळी मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे आदीची उपस्थिती होती.



**बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# खर्डा येथे श्री छत्रपती शिक्षण संकुलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमात प्रेरणादायी विचारांचा जागर.

खर्डा प्रतिनधी/१४एप्रिल२०२५ जामखेड तालुक्यातील खर्डा येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत ज्ञानेश्वर सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि आदर्श आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहेत, असे श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. महेश गोलेकर बोलत होते. ते म्हणाले, “डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही एका समाजाचे नव्हे तर संपूर्ण देशाचे नेते होते. त्यांनी भारतीय संविधानातून देशातील वंचित, दलित, शोषित घटकांबरोबरच सर्व समाज घटकांना समान न्याय व संधी मिळाल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त एक नेते नव्हते तर समानता आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम करणारे दूरदर्शी होते, असे पोलीस वारंटच्या संपादिका श्वेता गायकवाड यांनी यावेळी सांगितले. “ श्वेता गायकवाड यांनी भीमराव आंबेडकरांच्या योगदानाचे विशेष उल्लेख केले आणि ते प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ, न्यायशास्त्रज्ञ आणि




राजकारणी होते असे सांगितले. याप्रसंगी श्वेता गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर,महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर , ग्रामपंचायत सदस्य प्रकाश गोलेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून साप्ताहिक पोलीस वारंटच्या संपादिका श्वेता बापूसाहेब गायकवाड या होत्या. या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. महेश गोलेकर यांच्याकडून संपादिका श्वेता गायकवाड यांना महाविद्यालय विकास समितीच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित महाविद्यालय प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे, प्राचार्य प्रा. चंद्रकिशोर बारटक्के, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष विजयसिंह गोलेकर, उपाध्यक्ष प्रकाश गोलेकर, पत्रकार दत्तराज पवार, बाळासाहेब शिंदे, धनसिंग साळुंखे आदी याप्रसंगी उपस्थित होत. कार्यक्रमाची सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवानंद जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शेख मोहसीन यांनी केले.

# कांदिवली मध्ये पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. कांदिवली पश्चिम मधील पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सोमवार दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी कांदिवली पश्चिम स्वामी विवेकानंद रोड, पारेख नगर येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मनपा सर्व साधारण रुग्णालयाच्या कंपाऊंड मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला, रुग्णालयाच्या कंपाऊंड मधील माजी उपमहापौर स्व.शैलजा विजय गिरकर विश्रांती स्थळ या ठिकाणी मान्यवरांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर विषयी आपले विचार व्यक्त केले,या वेळी माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर, आमदार मनिषा चौधरी, आमदार संजय उपाध्याय यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन







संघर्षावरील, संविधान निर्मिती बाबतीत माहिती सांगितली.पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने धम्म प्रार्थना म्हटली.या जयंतीनिमित्त गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर आमदार मनिषाताई चौधरी आमदार संजय उपाध्याय, गणेश खणकर, दिलीप पंडित, नगर सेवक कमलेश यादव, नगर सेविका प्रियांका मोरे, नगर सेविका प्रतिभा गिरकर, कांदिवली विभागातील पत्रकार साहित्यिक भारत कवितके, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे संजय बावीस्कर, अशोक कांबळे,जय कांबळे, गजानन गवई , विपुल व्होरा, आदी उपस्थित होते तर भाजपा चे पुरुष व महिला पदाधिकारी कार्यकर्ते, पंचशील प्रतिष्ठान ट्रस्ट चे पदाधिकारी कार्यकर्ते, रुग्णालयातील कामगार, सुरक्षा रक्षक, रुग्णांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# निर्णयाचे स्वागत

चिंचवड देवस्थान ट्रस्ट कडून त्यांच्या अखत्यारित असणाऱ्या अष्टविनायकापैकी सिद्धटेक, मोरगाव, थेऊर, चिंचवडचा मोरया गोसावी संजीवनी मंदिर, खार नारिंगी मंदिर अशा पाच मंदिरात ड्रेस कोड लागू करण्यात येणार असल्याची बातमी वाचण्यात आली.खरेतर मंदिर आणि धर्मस्थळे ही आपल्या संस्कृतीची ओळख असते.काहीवेळा काही विशिष्ट ठिकाणी आपल्याला कसेही वागून आणि मनमानी करून चालत नाही.त्या स्थानाचे पावित्र्य जपणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य असते.पण बऱ्याचवेळा अनेक ठिकाणी आपल्याला अगदी कमी कपडे घातलेले स्त्री पुरुष दिसतात, जीन्स नको त्या ठिकाणी मुद्दाम फाडून ठेवलेल्या, शिवलेस ब्लाऊज, स्विमिंग सूट घालून देखील काहीजण दर्शन घेण्यासाठी येतात. हाफ पँट घालणं हल्ली स्त्री पुरुषांची फॅशन झाली आहे. आपली संस्कृती जपणे, तिची ओळख टिकवून ठेवणे यासाठी प्राधान्य द्यायला हवे.हल्ली आपण पश्चिमात्य लोकांची संस्कृती अवलंबित चाललो आहे तर परदेशातील लोक भारतात येऊन आपल्या भारतीय संस्कृतीची जमवून घेताना दिसतात.चांगले काय आणू वाईट काय आणि कोणते कपडे घालावेत, कोणते नाही एवढे शहाणपण आपल्या सर्वांकडे नक्कीच आहे.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १५ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# वाल्मिक कराडचं होणार होतं एन्काऊंटर? प्लॅनही ठरला होता? निलंबित पोलीस अधिकाऱ्याच्या दाव्याने खळबळ!

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख (Santosh Deshmukh) हत्या प्रकरणानंतर वाल्मिक कराड चर्चेच्या केंद्रस्थानी आला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात कराड हा प्रमुख आरोपी आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत वाल्मिक कराड आणि त्याच्या गँगचे अनेक कारनामे समोर आलेले आहेत. दरम्यान, सध्या तो तुरुंगात असताना एका निलंबित पोलीस अधिकाऱ्याने मोठा दावा केला आहे. मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर देण्यात आली होती, असा दावा त्याने केला आहे. त्याच्या या दाव्याने संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे.कासले यांच्या विधानाने एकच खळबळ मिळालेल्या माहितीनुसार वाल्मिक कराडला अटक करण्याच्या चार दिवस अगोदर त्याचे एन्काऊंटर करण्याची मला ऑफर होती, असा दावा निलंबित पोलीस अधिकारी रंजित कासले यांनी केला आहे. कासले यांच्या या विधानानंतर सगळीकडे एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे कासले यांच्या या दाव्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कासले हा विक्षिप्त माणूस आहे, असं त्यांनी म्हटलंय.

कासले यांनी नेमका काय दावा केला आहे? कासले यांचा एक व्हिडीओ सध्या समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर मिळाली होती, असा दावा केलाय. या व्हिडीओमध्ये कासले यांनी अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणावर बोलते होते. "मी आताच रुमवर आलो आहे. मी आताच एक न्यूज पाहिली की अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात 5 पोलिसांवर गुन्हा दाखल करा आणि एसआयटी बसवा असा आदेश देण्यात आला आहे. मला याच एन्काऊंटरबद्दल बोलायचं आहे. एसआयटी बसवून काहीही उपयोग होणार नाही. बोगस एन्काऊंटर कसं केलं जातं, हे मी तुम्हाला सांगतो. मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर देण्यात आली होती. मात्र



मी ही ऑफर नाकरली होती. माझ्याकडून एवढं पाप होणार नाही, असं मी सांगितलं होतं. एन्काऊंटर करण्यासाठी तुम्ही बोलाल तेवढी ऑफर देतात. 10 करोड, 20 करोड, 50 करोड अशी तुम्ही बोलाल तेवढी तुम्हाला ऑफर दिली जाते. मी सायबर क्राईम विभागात होतो. मी एन्काऊंटर करू शकतो, हे त्यांना माहिती होतं," असा दावा कासले यांनी केला.

अंजली दमानिया यांची कासले यांच्यावर टीका तर दुसरीकडे अंजली दमानिया यांनी कासले यांच्यावर टीका केली आहे. कासले हा माणूस अतिशय विक्षिप्त आहे. त्यांचे आधीचे व्हिडीओ हे अतिशय मद्यधुंद अवस्थेतील आहेत. तुमच्याकडे एवढं शहाणपण होतं, तर तुम्ही अधिकारी असताना तुम्ही ही कारवाई का केली नाही. हा माणूस साबयर विभागात आहे. सायबर विभागातील अधिकाऱ्याला कधीच कुणी एन्काऊंटर करायला सांगत नाही. फक्त प्रसिद्धीसाठी हे केलं जातंय, अशी टीका दमानिया यांनी केली.

# निर्भीड पत्रकार संघाची गेवराई तालुका कार्यकरणी जाहीर

## तालुका अध्यक्ष पदी अमोल कापसे यांची सहाव्यांदा बिनविरोध निवड

## तर सचिव पदी बाळासाहेब घाडगे यांची निवड

गेवराई दि. १५ प्रतिनिधी निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची गेवराई तालुका कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. निर्भीड पत्रकार संघाच्या संस्थापक अध्यक्षा रुचिता मलबारी यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढाका यांच्या शिफारशी वरून गेवराई तालुका कार्यकारणी ची निवड करण्यात आली. यावेळी गेवराई तालुका अध्यक्षपदी अमोल कापसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अमोल कापसे यांची सलग पहिल्यांदा तालुका अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. तर तालुका सचिव पदी बाळासाहेब घाडगे यांची निवड करण्यात आली या कार्यकारणी मध्ये शहराध्यक्षपदी सतीश वाघमारे यांची सलग दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. यावेळी तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते.

यावेळी तालुका अध्यक्ष पदी अमोल कापसे, तालुका उपाध्यक्षपदी असलम कादरी तालुका सचिव पदी बाळासाहेब घाडगे , तालुका कोषाध्यक्षपदी औदुंबर खेडकर, तालुका कार्याध्यक्षपदी अशोक मोरे,तालुका संघटक पदी, प्रवीण कुलथे तालुका प्रसिद्धी प्रमुख पदी सय्यद गफ्फार तर शहराध्यक्षपदी सतीश वाघमारे शहरउपाध्यक्षपदी शुभम घोडके , शहर सचिवपदी गजानन संभाहारे तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. पवन लाहोटी, यांची निवड करण्यात आली तर मार्गदर्शक म्हणून जेष्ठ पत्रकार, खदिर बागवान यांची निवड करण्यात आली. तर कार्यकारणी च्या सदस्यपदी अंगद गावडे,उस्मान शेख,समीर शेख,प्रदीप गाजरे, भाऊसाहेब महानोर, खदिर बागवान यांची निवड करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष अमोल कापसे यांनी पत्रकार संघाच्या गेल्या पाच वर्षाचा आढावा सादर करत यापुढे देखील निर्भीड पत्रकार संघ सर्वसामान्यांच्या न्यायासाठी व हक्कासाठी कायम कार्य करत राहणार असून नागरिकांच्या समस्या शासन दरबारी मांडून त्यांना न्याय देणासाठी निर्भीड पत्रकार संघ सदैव प्रयत्नशील राहिल असे मत व्यक्त मनोगत निर्भीड पत्रकार संघांचे तालुका अध्यक्ष अमोल कापसे यांनी व्यक्त केले.

यावेळी मोठ्या संख्येने निर्भीड पत्रकार संघातील पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

# साहेबराव नंदन तात्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय साहित्य भुषण पुरस्काराने सन्मानित



पिंपळनेर प्रतिनिधी विश्वशांती बुध्दिस्ट फाऊंडेशन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय शिक्षक अकादमी धुळे शहर यांचा बहुम ानांकित , बहुचर्चित , सदैव चर्चे त असलेला, बहुसंख्य प्रस्तावातून निवडक साहित्यिकांना दिला जाणारा राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय साहित्य भुषण पुरस्कार २०२५ नुकताच राज्य सरकारी कल्यान भवन शिवतिर्थ धुळे येथील सभाग्रहात उत्साही वातावरणात खान्देशातील गावगाडाकार कवी लेखक संपादक श्री साहेबराव नंदन ि तात्या ॆ ताहाराबादकर नाशिक यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. भास्करराव अमृतसागर, साहित्यिका कवयित्री मुंबईच्या आशाताई ब्राम्हणे यांच्या शुभ हस्ते टाळ्यांच्या कडकडाटात प्रदान करून, सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी राज्यभरातील बहुसंख्य साहित्यिक आणि जेष्ठ विचारवंत उपस्थित होते. साहेबराव तात्यांना मिळालेल्या पुरस्काराचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अध्यात्मिक क्षेत्रातून व सामाजिक संस्थांनी अभिनंदनाचा वर्षाव करत आनंद व्यक्त केला आहे.



माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे,सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे ,लेखापाल उद्धव फपाळ व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव

# भीम सागराने वाहिली महामानवास पुष्पफुले

## बीड जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात; जयंतीच्या भव्य मिरवणूकीने वेधले शहराचे लक्ष

बीड/प्रतिनिधी विश्वरत्न, महामानव, बोधिसत्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) रोजी सकाळी १० वाजता बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भिम सागर उसळला होता.आंबेडकरी जनतेने पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन महामानवाला अभिवादन केले. दरम्यान बीड जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विश्वातील अनेक देशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जाते. त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सोमवार (दि.१४) एप्रिल रोजी महामानवास अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी जनतेने अलोट गर्दी केली होती. यावेळी भिख्कु धम्मशिल थेरो, महालिंग निकाळजे, बौद्धचार्य सदाशिव कांबळे, गौतम खेमाडे यांनी उपस्थित आंबेडकरी जनसमुदायाला त्रीशरण, पंचशिल, भिमस्तुती, शरणतय ग्रहण करुन देत उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित केले.दरम्यान जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक, नवनीत कावत, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे,एसडीएम कविता जाधव, सीओ नीता अंधारे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे या सर्वांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करुन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मनोज जरांगे पाटील,आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.जनार्धन तुपे, सुशीलाताई मोराळे, प्रा.प्रदिप रोडे, अजय सवाई, सचिन मुळुक,अशोक हिंगे,अशोक लोढा, चंद्रकांत नवले, गौतम चोपडे, राजू जोगदंड,ड. भगवान कांडेकर,अविनाश जोगदंड, बबन वडमारे, अनिल डोंगरे, अरुणाताई आठवले, सुमेध जोगदंड, ड. राजेश शिंदे, प्रा.अशोक गायकवाड, इंजि स्वप्निल चोपडे, मनोज वाघमारे, गंगाधर काळकुटे, मनोज जाधव, म्हलारी जाधव, यांच्यासह भिम सागर उसळला होता. असा होता पोलीस बंदोबस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्या अनुषंगाने तब्बल १०५० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. त्यामध्ये ११५ पोलीस कर्मचारी, दंगल नियंत्रण पथक ६, राज्य राखीव दल पथक, ८५० होमगार्ड असा पोलीस बंदोबस्त होता. सार्वजनिक जयंतीचा आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून ४ ते १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडले. १३ तारखेला सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला.

# हा नंतर आला..येऊन काड्या: चंद्रकांत खैरे संतापले, दानवेंची तक्रार आता थेट ठाकरेंकडे करणार

छत्रपती संभाजीनगरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षात येथे नाराजीनाट्य रंगले आहे. संभाजीनगरचे माजी खासदार तथा ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे आणि विरोधी पक्षनेते तथा ठाकरेंच्या पक्षाचे नेते अंबादास दानव एकमेकांवर गंभीर स्वरुपाचे आरोप करत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या पक्षाच्या मेळाव्याबाबत मला काहीही सांगितलेले नाही. मला दानवे यांनी बोलावलेले नाही, असा दावा खैरे यांनी केलाय. तर दुसरीकडे मी कार्यक्रम पत्रिकेत मार्गदर्शक म्हणूनच नाव टाकले होते, असा दावा दानवे यांनी केलाय. त्यानंतर आता मी दानवे यांची तक्रार उद्धव ठाकरेंकडे करणार आहे, असं खैरेंनी म्हटलंय

चार महिन्यांत त्यांच पद जाणार- खैरे

"मला अंबादास दानवे यांनी काहीही सांगितलेले नाही. मी स्पष्टपणे सांगतो. मी हे उद्धव ठाकरे यांना सांगणार आहे. तो अंबादास हा स्वत:ला मोठा समजतो. आता फक्त





चार महिने तो विरोधी पक्षनेता राहणार आहे. त्यानंतर त्यांचं पद जाणार आहे," अशी घणाघाती टीका चंद्रकांत खैरे यांनी अंबादास दानवे यांच्यावर केली. दानवे काड्या करण्याचं काम करतात- खैरे मी उद्धव ठाकरे यांच्याकडे अंबादास दानवे यांची तक्रार करणार आहे. आमची परवा बैठक आहे. या बैठकीत मी सगळं सांगणार आहे. तुम्ही आम्हाला कचरा समजत आहात का? अंबादास दानवे हे नंतर आलेले आहेत. नंतर येऊन ते काड्या करण्याचे काम करत आहेत. मला हे बिलकूल आवडत नाही," असा हल्लाबोल चंद्रकांत खैरे यांनी केला. अंबादास दानवे यांनी काय स्पष्टीकरण दिलं? माझ्या माहितीप्रमाणे नागपूरला त्यांच्या समाजाचा एक मेळावा होता. या मेळाव्याला ते गेले होते. ते मागच्या काळात माझ्याविषयी काही-काही बोलले. मी त्याला उत्तर दिलेलं नाही. आताही मी काहीही उत्तर देणार नाही. त्यांनी पक्षाच्या कार्यक्रमाला दांडी मारली की नाही हे त्यांनाच विचारा. मला काहीही विचारू नका," असं स्पष्टीकरण दानवे यांनी दिलंय. तसेच, मी मेळाव्याच्या कार्यक्रमाला खैरे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com